जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

वरुड | शनिवार
१८.०४.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ७७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712


## थोडक्यात

### गृहमंत्री देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडमध्ये, अशोक खरात, नाशिक धर्मांतर प्रकरणाचा घेतला आढावा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नाशिक** -राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गृह विभागाची तातडीची आढावा बैठक घेतली.

नाशिक चे बहुचर्चित खरात प्रकरण, आयटी कंपनीतील धर्मांतर प्रकरण, परतवाडा आणि गोरेगाव ड्रग्ज प्रकरणाच्या तपासाची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. या बैठकीला पोलीस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस दलाला महत्त्वाचे आदेश दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

# १५ हजारांच्या मागणीवरून खंडणीचा गुन्हा

## अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाडांचे अखेर निलंबन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अकोला** - अकोल्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. गायकवाड यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर सरकारनं मोठी कारवाई केलीय.

गुन्हा दाखल झाल्यानंतर गायकवाड यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं होतं. खाण आणि स्टोन क्रशर मालकांना खंडणी मागण्याच्या आरोपावरून अकोल्यातील एमआयडीसी पोलिसांमध्ये गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, १५ हजारांची लाच घेणं अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांना भोवलं असून या प्रकरणी त्यांचं निलंबन करण्यात आलं आहे.

१५ हजारांची मागणी केल्याचा आणि धमकावल्याचा खाणमालकांचा आरोप, प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ अकोल्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी खाणमालकांना प्रत्येकी १५ हजारांची मागणी केल्याचा आणि धमकावल्याचा खाणमालकांचा आरोप होता. त्यावरून दोन आठवड्यापूर्वी खाण आणि क्रशर मालकांनी एमआयडीसी पोलिसांमध्ये तक्रार केली होती. या तक्रारीवरून अतिरिक्त जिल्हाधिकारी गायकवाड यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल झाल्यानंतर अखेर निलंबन झाल्याने जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निलंबन काळात गायकवाड यांचं अकोला जिल्हाधिकारी कार्यालय मुख्यालय असेल. तर पूर्वसूचने शिवाय अकोला मुख्यालय न सोडण्याचे गायकवाड यांना शासनाने आदेश दिला आहे.

पनवेलवरून गावी उत्तर कार्यासाठी निघालेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू; पत्नी देखील गंभीर जखमी रायगडच्या श्रीवर्धन मधील आरावी गावाकडे पनवेल वरून गावी येण्यासाठी निघालेल्या एका तरुणाचा रस्त्यातच अपघाती मृत्यू झालाय. आपल्या गावी भावाच्या उत्तर कार्यासाठी येत असताना म्हसळा शहराजवळच्या जांभूळ गावाजवळ येताच वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन थेट आंब्याच्या झाडावर आदळल आणि हा अपघात झाला.या अपघातात नरेश जनार्दन पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांच्या पत्नी राजेश्री पाटील या देखील गंभीर जखमी झाल्या आहेत.

# केंद्र सरकारचा निर्णय : 'आधार' ॲपची सक्ती नाही, प्री-इन्स्टॉलचा प्रस्ताव रद्द

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** - स्मार्टफोनमध्ये 'आधार' ॲप अनिवार्यपणे आधीच इन्स्टॉल करून देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मागे घेतला आहे. उद्योग क्षेत्राशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

आयटी मंत्रालयाची भूमिका स्पष्ट युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने जानेवारी महिन्यात स्मार्टफोनमध्ये बायोमेट्रिक ओळख ॲप प्री-इन्स्टॉल करण्याचा प्रस्ताव माहिती तंत्रज्ञान मंत्रालयासमोर ठेवला होता. मात्र, या प्रस्तावाला आयटी मंत्रालयाने पाठिंबा दिला नाही.

यूआयडीआयएच्या माहितीनुसार, मंत्रालयाने उद्योग क्षेत्राशी सल्लामसलत केल्यानंतर हा प्रस्ताव नाकारण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुरक्षा आणि खर्चाबाबत उद्योगांचे आक्षेप माहितीनुसार, स्मार्टफोन उत्पादक कंपन्या आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाने या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला होता. डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेबरोबरच उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. ॲपल आणि सॅमसंग यांसारख्या कंपन्यांनी सुरक्षा आणि प्रायव्हसीबाबत आक्षेप घेतल्याची माहिती समोर आली आहे.

स्वतंत्र उत्पादन व्यवस्थेची गरज उद्योग प्रतिनिधींनी असेही नमूद केले की, भारतात विक्रीसाठी असलेल्या स्मार्टफोनसाठी वेगळी उत्पादन साखळी उभारावी लागेल, ज्यामुळे खर्च वाढण्याची शक्यता असून, भारताला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन केंद्र बनवण्याच्या प्रयत्नांवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

दोन वर्षांत सहावा प्रयत्न गेल्या दोन वर्षांत सरकारी ॲप्स प्री-इन्स्टॉल करण्यासाठी हा सहावा प्रयत्न होता. यापूर्वीही उद्योग क्षेत्राने प्रत्येकवेळी याला विरोध केला होता.


'संचार साथी' ॲपचाही प्रस्ताव मागे यापूर्वी डिसेंबरमध्ये सरकारने 'संचार साथी' सायबर सुरक्षा ॲप प्री-इन्स्टॉल करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मात्र, सुरक्षा आणि गोपनीयतेच्या मुद्द्यांवरून टीका झाल्यानंतर तो निर्णयही मागे घेण्यात आला.

# अंकित प्रभू यांचा लहान तोंडी मोठा घास

## सभागृह नेत्यांची अप्रत्यक्ष उडवली खिल्ली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**मुंबई** - मुंबई महापालिकेच्या सभागृहात उबाठाचे नगरसेवक अंकित प्रभू यांनी लहान तोंडी मोठा घास घेण्याचा प्रयत्न केला.

आपल्या भाषणांत आमदार सुनील प्रभू यांचे यांचे पुत्र अंकित यांनी महापालिका सभागृहात वामनराव महाडिक यांनी तब्बल ८ तास संस्कृतमध्ये भाषण केल्याचे सांगत एकप्रकारे जणू काही आपण त्यावेळी उपस्थितच होतो,असे भासवण्याचा प्रयत्न केला. परंतु महाडिक यांनी अशाप्रकारे भाषण केल्याचे मी वाचले आहे किंवा ज्येष्ठ नगरसेवकांकडून ऐकले आहे असे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी न केल्यामुळे एकप्रकारे त्यांच्या भाषणातील मीपणा दिसून आला.

एवढेच नाही तर त्यांनी वारंवार अप्रत्यक्षपणे सभागृहनेत्यांचा अवमान करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांचा देव कडक असल्याचे सांगत कधीतरी आम्हाला आपल्या देवाकडेही घेवून चला असे सांगण्याचा प्रयत्न केला. भाजपाच्या नगरसेवकांनी देवाभाऊ... देवाभाऊ असे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अंकितला नक्की खणकर यांच्या कोणत्या देवाला भेटायचे आहे असा प्रश्न सर्वांच्या मनात निर्माण झाला. मुंबई महापालिकेच्या सन २०२६-२७च्या अर्थसंकल्पावर भाषण करताना उबाठाचे नगरसेवक अंकित प्रभू यांनी भाषणाच्या ओघात आपल्या समोर वरिष्ठ नगरसेवक असल्याचे तसेच सभागृहनेते यांचा सन्मान राखण्याऐवजी त्या पदाचीच खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला.

# १८ बाटल्या फोडल्या : दारु नाकारताच तरुणांचा बारमध्ये धुडगूस, मॅनेजर रक्तबंबाळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**नागपूर** - नागपूरमध्ये मध्यरात्री घडलेल्या एका धक्कादायक प्रकाराने खळबळ उडाली आहे. दारु देण्यास नकार दिल्याच्या रागातून काही तरुणांनी बारमध्ये घुसून मॅनेजरवर हल्ला केला आणि मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १६ एप्रिलच्या मध्यरात्री नागपूरच्या मानेवाडा चौक परिसरातील एसके बारमध्ये ही घटना घडली. बार बंद करण्याची वेळ झाल्याने कर्मचाऱ्यांनी काही तरुणांना पुन्हा दारू देण्यास नकार दिला. याच कारणावरून संतप्त झालेल्या तरुणांनी गोंधळ घालत थेट मॅनेजरला मारहाण केल्याचं सांगितलं जात आहे.

व्हीडीओमध्ये दिसतो थरारक हल्ला व्हायरल व्हिडिओमध्ये बारचा काउंटर आणि कर्मचारी दिसत आहेत. काही क्षणांतच मोठा आवाज येतो आणि कर्मचारी बाहेर काय घडतंय हे पाहण्यासाठी पुढे जातात. त्यानंतर अचानक काही तरुण आत घुसून मॅनेजरवर हल्ला करताना दिसतात. स्वतःचा बचाव करण्यासाठी मॅनेजर काउंटरच्या मागे लपण्याचा प्रयत्न करतो. मात्र, ते टवाळखोर काउंटरवरील दारूच्या बाटल्या उचलून मॅनेजरच्या दिशेने फेकतात.

१५ ते १८ बाटल्यांची तोडफोड हल्लेखोरांनी अवघ्या काही क्षणांत सुमारे १५ ते १८ दारूच्या बाटल्या फोडल्याचं सांगितलं जात आहे. काही जण काउंटरवर चढून मॅनेजरला मारहाण करताना दिसतात, तर इतरांनी कर्मचाऱ्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# मानधना टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** - भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिकी महिला संघ यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना डर्बन येथे खेळला गेला, ज्यात भारतीय संघाला सहा गडी राखून पराभव पत्करावा लागला.

दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतासाठी शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी डावाची सुरुवात केली आणि पाच षटकांत पहिल्या विकेटसाठी ४६ धावा जोडल्या. वर्मा २० चेंडूंमध्ये पाच चौकार आणि एका षटकारासह ३४ धावा करून बाद झाली. भारतासाठी डावाची सुरुवात करणाऱ्या स्मृती मानधनाला या सामन्यात मोठी खेळी करता आली नाही आणि ती केवळ १३ धावा करू शकली. पण, या छोट्याशा खेळीदरम्यान तिने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. रोहित शर्माला मागे टाकत मानधना आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताची सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू बनली आहे. मानधनाच्या नावावर आता ४,२४४ धावा आहेत, तर रोहितने ४,२३१ धावा केल्या आहेत. विराट कोहली आता ४,१८८ धावांसह या यादीत तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर ३,८६९ धावांसह चौथ्या स्थानावर आहे. सूर्यकुमार यादव ३,२७२ धावांसह पाचव्या स्थानावर आहे.




# त्रासदायक गतिरोधक हटविणार, हाय बिम लाईटवर कारवाई

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी ब्लॅकस्पॉटवर गतिरोधक बसविण्यात येतात. मात्र अवैज्ञानिक पद्धतीने गतिरोधक बसविण्यात आले आहे. ही गतिरोधक वाहनधारकांना त्रासदायक ठरत असल्याने ते तातडीने हटविण्यात यावे, तसेच वाहनांवर प्रखर उजेड करणारी हाय बिम लाईटवर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज रस्ते सुरक्षा समितीची बैठक पार पडली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यात तयार करण्यात येणारे गतिरोधक वाहनाच्या अपघातास कारणीभूत ठरू नये. यासाठी ठरवून दिलेल्या मानकानुसार गतिरोधक तयार करण्यात यावेत. गतिरोधकावर पांढऱ्या पट्ट्या काढण्यात याव्यात. यामुळे गतिरोधकाची वाहनचालकांना कल्पना येऊ शकेल. जड वाहनांवर प्रखर उजेड असणारी बाय बिम लाईट लावण्यात येत आहे. यामुळे समोरील वाहनचालकाची दृष्यमानता कमी होत असल्यामुळे अपघात होत आहे. यावर पोलिस आणि प्रादेशिक परिवहन विभागाने संयुक्तपणे मोहिम राबवून कारवाई करावी. शहरात सायलेंसरमध्ये बदल करून दुचाकी वाहने चालविल्या जातात. यावर पोलिसांनी कारवाई करावी. शिंगणापूर, हिवरखेड, डवरगाव आणि लेहगाव येथील हायमास्ट लाईटचा प्रश्न आहे. याबाबत संबंधित ग्रामपंचातींशी संपर्क साधून येथी प्रकाशव्यवस्था सुरळीत राहील याची काळजी घ्यावी. तसेच रिद्धपूर येथील पुलाच्या बांधकामामुळे झालेल्या अपघाताची काळजी म्हणून वाहनचालकांसाठी पर्यायी मार्ग देण्यात यावी. तसेच रहदारीच्या रस्त्यांवर विकास कामे सुरू असल्यास सुरक्षा विषयक उपाययोजना करण्यात याव्यात. अपघातातील जखमींना मदत करण्यासाठी पीएम राहत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत दिड लाख रूपयांपर्यंत उपचार करण्यात येतात. याबाबत जनजागृती करण्यात यावी. अपघाताची माहिती गोळा करण्यासाठी आयआरडीएच्या पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी. रस्ता सुरक्षेसाठी विविध उपाययोजनेमध्ये स्पीड गन, स्पीड मिटर आदी सुविधा उभाराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

# मोदीजी, आम्हाला माफ करा! महिला आरक्षण विधेयक नामंजूर होताच नवनीत राणांना अश्रू अनावर

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**अमरावती** – देशाच्या राजकारणात सध्या गाजत असलेलं महिला आरक्षण विधेयक अखेर लोकसभेत नामंजूर झाले आहे. सरकारला याविधेयकाच्या बाजूने दोन–तृतीयांश बहुमत मिळाले नाही.

तसेच महिला आरक्षण विधेयकासोबतच मतदारसंघ पुनर्रचना विधेयकही मंजूर होऊ शकले नाही. परिणामी, हे विधेयक नामंजूर झाल्यानंतर सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी विरोधकांना लक्ष्य करत टीकेची तोफ डागली आहे. याच मुद्यावरुन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदी सरकारवर टीका करताना म्हटलेय कि आज लोकशाहीचा मोठा विजय झाला आहे.

इंडिया आघाडीनं मोदी सरकारचा डाव हाणून पाडलाय, असे म्हणत महिला आरक्षण विधेयकावरुन हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदी सरकारवर कडाडून प्रहार केला. तर दुसरीकडे याच मुद्यावर प्रतिक्रिया देताना भाजप नेत्या नवनीत राणा या अतिशय भावूक झाल्या आहेत. लोकसभेमध्ये महिला आरक्षण घटना दुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्याने नवनीत राणाच्या डोळ्यात अश्रू आले आहेत.

विरोधकांनी हे विधेयक पास होऊ दिले नाही, त्यामुळे आजचा दिवस हा काळादिवस म्हणून आठवणीत राहील. विरोधकांनी विरोध केला पण महिला तुम्हाला कधीच माफ करणार नाही. आजचा काळा दिवस हा विरोधकांनी बनवलाय. पंतप्रधान मोदी यांनी महिलांना न्याय देण्यासाठी पूर्ण प्रयत्न केला, त्यामुळे त्यांना दंडवत. मात्र आम्ही त्यांची माफी मागतो, त्यांना आम्ही पूर्ण बहुमत देऊ शकलो नाही. अशी प्रतिक्रिया माजी खासदार नवनीत राणा यांनी दिली.

इंडिया आघाडीचा महिला आरक्षणला विरोध नव्हता तर डीलिमिटेशला आम्ही विरोध केला आम्ही महिला आरक्षण बिलासाठी पाठिंबा दिला होता. मात्र जनगणना होण्याआधी याने अनेकांवर अन्याय झाला असता.

महिला आरक्षणला इंडिया आघाडीचा विरोध नव्हता तर डीलिमिटेशला आम्ही विरोध केला, भाजपचा प्रयत्न हणून पडला. कोलकाता आणि तामिळनाडूमध्ये याचा वापर केला जाऊ शकतो. भाजप यावर १०० टक्के याचे राजकारण करेल, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी दिली आहे.

महिला आरक्षण विधेयक हे एक राजकीय षडयंत्र होते,ते कोसळले तर दुसरीकडे याच मुद्यावर बोट ठेवत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील सरकारवर कडाडून टीका केली आहे. महिला आरक्षण विधेयक हे एक राजकीय षडयंत्र होते,ते कोसळले! अशा शब्दात संजय राऊतांनी तोफ डागली आहे.

## अशोक खरातविरोधात तक्रारींचा पाऊस, हेल्पलाईनवर २३ दिवसांत शेकडो कॉल्स, आतापर्यंत १५ गुन्हे दाखल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – संपूर्ण महाराष्ट्र हादरवून सोडणाऱ्या नाशिकचा भोंदू अशोक खरात प्रकरणात दररोज धक्कादायक खुलासे होत आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक नेमले असले, तरी घटनेचे गांभीर्य पाहून महाराष्ट्र पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी स्वतः या तपासाचा दैनंदिन आढावा घेत असल्याची माहिती समोर येत आहे. तक्रारीसाठी महिला सरसावल्या सुरुवातीला काही व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे अनेक महिला बदनामीच्या भीतीपोटी तक्रार करण्यासाठी पुढे येत नव्हत्या. मात्र, पोलिसांनी महिलांना विश्वासात घेऊन त्यांची ओळख गोपनीय ठेवण्याचे आश्वासन दिल्याने आता तक्रारींचा ओघ वाढला आहे. यासाठी सुरू करण्यात आलेल्या विशेष हेल्पलाईनवर दिवसाला ५ ते ६ कॉल येत असून, गेल्या २३ दिवसांत शेकडो फोन आल्याची माहिती समोर आली आहे.

## बीएसएनएलतर्फे सोमवारी प्रबोधनात्मक कार्यक्रम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – क्रांतिबा महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीएसएनएलतर्फे प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सोमवार, दि. २० एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता जोशी हॉल, बँक ऑफ बडोदाच्या मागे, श्याम चौक जवळ येथे होणार आहे.

सामाजिक समता, शिक्षण, विवेकवाद आणि लोकशाही मूल्यांच्या प्रसारासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीएसएनएलच्या महाप्रबंधक माधुरी निमजे राहणार आहेत. प्रमुख व्याख्याते म्हणून पैगंबर शेख (पुणे) उपस्थित राहणार आहेत. ते 'शिव–फुले–शाहू–आंबेडकर विचारधारा – सर्वांगीण भारताची मूलभूत गरज' या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच दिलीप सोळंके (अमरावती) हे 'फुले–आंबेडकर यांचा विवेकवाद आणि सद्यस्थिती' या विषयावर आपले विचार मांडतील.

सर्व नागरिकांनी या विचारप्रबोधनात्मक कार्यक्रमास संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक बीएसएनएल कर्मचारी संयुक्त जयंती कृती समिती, अमरावती यांच्यावतीने करण्यात येत आहे.

## तत्त्वांशी एकनिष्ठ राहणाऱ्यांचं राजकारण संपतंय, प्राजक्त तनपुरेंच्या वक्तव्याने चर्चांना उधाण, शरद पवार गटाची पहिली प्रतिक्रिया

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत ऐनवेळी भाजपच्या विनंतीनंतर माघार घेणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचे नाव प्रचंड चर्चेत आहे. खरंतर तनपुरे भाजपमध्ये जातील, सत्तेत सहभागी होतील, अशी जोरदार राजकीय वतुर्ळात रंगली आहे. मात्र, आता प्राजक्त तनपुरे यांच्या एका सूचक वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सध्या तत्त्व सांभाळणाऱ्यांचे राजकारण संपत चालले आहे, असे वक्तव्य तनपुरे यांनी केले. ते शुक्रवारी 'एबीपी माझा'शी बोलत होते. प्राजक्त तनपुरे यांनी यापूर्वी अनेकदा संधी असतानाही सत्तेत न जाता पक्षनिष्ठा सांभाळली. परंतु, निष्ठा, तत्व सांभाळतांना राजकीय नुकसान झाल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. माझ्यासोबत पक्षात असणारे तिघेजण राष्ट्रवादी अजित पवार पक्षात गेले, तिकडे त्यांना कॅबिनेट मंत्री पद मिळाले.

# नरेंद्र मोदी विरुद्ध अमित शाह संघर्ष दिसला, संजय राऊतांचा घणाघात

## महिला आरक्षणाच्या नावाखाली भोंदू बिल लोकसभेत आणलं!

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – नारी शक्ती वंदन अधिनियम (१३१ वी घटनादुरुस्ती) आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांवर देशाच्या संसदेत गुरुवारी जोरदार चर्चा झाली. त्यानंतर शुक्रवारीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांनी आपापली मते मांडली. या विधेयकांवर शुक्रवारी साडेसात वाजता मतदान घेण्यात आले. एकूण ५२८ सदस्यांनी मतदान केले. त्यापैकी २९८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने, तर २३० सदस्यांनी विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी दोन–तृतीयांश विशेष बहुमत आवश्यक असते. मात्र, आवश्यक बहुमत न मिळाल्यामुळे हे विधेयक नामंजूर झाले. त्यामुळे मोदी सरकारसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. आता यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केलाय. संजय राऊत म्हणाले की, अमित शाहांनी मोदींना अपमानित करण्यासाठी हे विधेयक आणलं. महिला आरक्षणाच्या नावाखाली एक भोंदू बिल लोकसभेत आणलं. त्यांचा मूळ उद्देश हा महिलांना आरक्षण देण्याचा अधिकार वगैरे काहीही नव्हता. ५४३ जागांवरून ८५० जागा करायच्या आणि सत्तेचा अमरपट्टा बांधून सतत विजय प्राप्त करायचा, याशिवाय अमित शाह आणि त्यांच्या लोकांचा कुठलाही हेतू नव्हता. पुरुष विरुद्ध महिला, असा संघर्ष पेटवायचा होता बेकायदेशीरपणे विजय मिळवण्याच्या संदर्भातील हे बिल होते.

## मे अखेरपर्यंत कोस्टल रोडवर दोन फ्लड गेट्स बसवणार : इंदूर येथे चाचणी झाली पूर्ण

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई :–** कोस्टल रोडवर पावसाळ्यात जमा होणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी १५ फ्लड गेट्स बसवण्यात आले आहेत. मात्र यापैकी दोन फ्लड गेट्सचा आराखडा चुकल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे नव्याने फ्लड गेट्स बसवण्यात येणार असून इंदूर येथे चाचणी करण्यात आली आहे.

हे दोन्ही गेट मे अखेरपर्यंत बसवण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले. पावसाळ्यात कोस्टल रोडवर पाणी जमा झाल्यास तातडीने उपसा करण्यासाठी मरीन ड्राईव्ह ते वरळी सी–लिंक दरम्यान १५ फ्लड गेटब बसवण्यात आले आहेत. मात्र, समुद्रकिनाऱ्यापासून ६५ मीटर अंतरावर हे दोन्ही फ्लड गेट्स असल्याने समुद्राच्या लाटांच्या धडकेत नुकसान झाले. नैसर्गिक परिस्थितीमुळे पूर प्रतिबंधक गेटचे नुकसान ही घटना नैसर्गिक परिस्थितीच्या परिणामामुळे घडली असून डिझाईन साहित्याची गुणवत्ता किंवा कामाच्या दर्जाबाबत कोणत्याही त्रुटी नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

## ५० लाखांच्या लाचेची मागणी करणाऱ्या 'डीआरआय'च्या दोन अधिकाऱ्यांवर गुन्हा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) दोन तत्कालीन गुप्तचर अधिकाऱ्यांनी एका आरोपीकडून ५० लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकारणी 'केंद्रीय अन्वेषण विभागाने' (सीबीआय) गुन्हा दाखल केला आहे. संबंधित आरोपीला 'डीआरआय'ने अटक केली होती आणि त्याला या प्रकरणात सवलत देण्यासाठी या लाचेची मागणी करण्यात आली होती.

'सीबीआय'ने दिलेल्या माहितीनुसार, 'डीआरआय' मुंबईच्या सहसंचालकांनी या प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला होता. डी. कुमार हे 'डीआरआय' मुंबईत वरिष्ठ गुप्तचर अधिकारी म्हणून कार्यरत होते, तर सीजीएसटी आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक सी. पारिक हे 'डीआरआय'मध्ये प्रतिनियुीवर कार्यरत होते. या दोघांनी एका व्यक्तीला ३० सप्टेंबर २०२५ रोजी कोलकाता विमानत ळावरून अटक केली होती.

# एसटी बस स्थानकांवरील शौचालये १ जूनपासून मोफत

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**कोल्हापूर : –** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त येत्या १ जूनपासून राज्यातील सर्व बस स्थानकांवरील शौचालय सुविधा प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकाच्या पाहणी दौऱ्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

प्रवाशांकडून बस भाड्यातून स्वच्छता कर आधीच आकारला जात असल्याने आता हा खर्च महामंडळ स्वतः उचलणार आहे. यासाठी खासगी कंत्राटदारांकडून चालवली जाणारी शौचालय व्यवस्था बंद करून ती जबाबदारी महामंडळाकडेच देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्यावेळी राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाच्या प्रादेशिक व्यवस्थापक अमृता ताम्हणकर, विभागीय वाहतूक अधिकारी अनिल मेहतर तसेच स्थानिक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

३० रुपयांत चहा–नाश्ता दरम्यान, उपाहारगृहात गरजूंसाठी ३० रुपयांत चहा–नाश्ता देण्याची योजना कागदावरच असल्याचे आढळल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. ही योजना २४ तासांत सुरू करून त्याबाबतचे फलक दर्शनी भागात लावण्याचे आदेश त्यांनी दिले, अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला. प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी स्थानकातील विविध विभागांची पाहणी केली. स्वच्छतेबाबत हलगर्जीपणा किंवा प्रवाशांकडून बेकायदेशीर वसुली आढळल्यास संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# संपादकीय

**आपले शत्रू ज्याचे शत्रू असतील तोच आपला खरा मित्र होय.**

## २०३४ ची निवडणूक : महिला आरक्षण, जात गणना आणि लोकशाहीची नवी समीकरणे

भारतीय लोकशाहीच्या प्रवासात आगामी दशकात होणारी २०२९ आणि विशेषतः २०३४ ची लोकसभा निवडणूक ही केवळ सत्तेचे समीकरण बदलणारी नसेल, तर ती भारतीय समाजव्यवस्थेच्या नव्या रचनेचे प्रतिबिंब असेल. 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'द्वारे महिलांना मिळालेले ३३ टक्के आरक्षण आणि सध्या जोर धरत असलेली जातनिहाय जनगणनेची मागणी, या दोन अशा कळीच्या बाबी आहेत ज्या २०३४ च्या राजकारणाची दिशा ठरवतील. मात्र, हे आरक्षण लागू करण्यातील तांत्रिक अडथळे आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा पेच यामुळे एक मोठा राजकीय आणि घटनात्मक पेच उभा ठाकला आहे. महिला आरक्षण: प्रतीक्षा की तांत्रिक अडचण? संसदेने महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर केले असले तरी, त्याची अंमलबजावणी दोन अटींवर अवलंबून आहे: पहिली - जनगणना आणि दुसरी - मतदारसंघांची पुनर्रचना सरकारचा सुरुवातीचा विचार असा होता की, मतदारसंघांची संख्या सरसकट ५० टक्क्यांनी वाढवावी. असे केल्यास: विद्यमान पुरुष खासदारांच्या जागांना धक्का न लावता महिलांना ३३ टक्के आरक्षण देता आले असते. मतदारसंघातील लोकसंख्या कमी झाल्यामुळे लोकप्रतिनिधींना आपल्या मतदारांशी संपर्क साधणे सोपे झाले असते. परंतु, हा प्रयत्न आता मागे पडल्याचे दिसते. सध्याच्या परिस्थितीत, उत्तर भारतातील राज्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे, तर दक्षिण भारतातील राज्यांनी कुटुंब नियोजनाच्या बाबतीत उत्तम कामगिरी केली आहे. जर लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची वाढ केली, तर दक्षिण भारताचे प्रतिनिधित्व कमी होईल आणि उत्तर भारताचे वर्चस्व वाढेल. या प्रादेशिक असमतोलामुळे मतदारसंघांच्या वाढीचा निर्णय लांबणीवर पडला आहे. परिणामी, महिलांना २०३४ पर्यंत या आरक्षणाची प्रतीक्षा करावी लागणारी चिन्हे दिसत आहेत. जातनिहाय जनगणना: आरक्षणाचे नवे परिमाण महिला आरक्षणासोबतच सध्या देशात 'जातनिहाय जनगणना' आणि 'ज्याची जेवढी संख्या, त्याची तेवढी भागीदारी' हा मुद्दा अत्यंत प्रभावी ठरत आहे. २०३४ च्या निवडणुकीत जात हा घटक केवळ मतदानापुरता मर्यादित न राहता, तो आरक्षणाच्या पुनर्रचनेचा मुख्य आधार असेल. ओबीसी महिलांचे आरक्षण: महिला आरक्षणांतर्गत 'ओबीसी' महिलांसाठी स्वतंत्र कोटा असावा, ही मागणी आता जोर धरत आहे. जर २०३४ पर्यंत जातनिहाय जनगणना झाली, तर ३३ टक्के महिला आरक्षणाचे स्वरूपही बदलू शकते. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा: सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून जातीच्या लोकसंख्येनुसार आरक्षण देण्याचे वारे वाहू लागले आहेत. याचे स्पष्ट प्रतिबिंब २०३४ च्या उमेदवारी वाटपात दिसेल. मतदारसंघांची पुनर्रचना आणि आव्हाने मतदारसंघ 'थोड्या कमी लोकसंख्येचे' करावेत, ही मागणी रास्त आहे. भारताचा एक खासदार सरासरी २५ ते ३० लाख लोकांचे प्रतिनिधित्व करतो, जे जगात सर्वाधिक आहे. तुलनेने अमेरिका किंवा ब्रिटनमध्ये हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

'लोकशाही तेव्हाच सक्षम होते, जेव्हा लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील अंतर कमी असते.'

जर मतदारसंघांची संख्या वाढली नाही, तर महिलांना आरक्षण देण्यासाठी सध्याच्या पुरुष लोकप्रतिनिधींच्या जागा कमी कराव्या लागतील. हा राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील निर्णय आहे. यामुळेच राजकीय पक्ष यावर एकमत करण्यास कचरत आहेत. २०३४: बदलांचे प्रतिबिंब

२०३४ ची निवडणूक ही खऱ्या अर्थाने 'सोशल इंजिनीअरिंग'चा परमोच्च बिंदू असेल. त्याचे कारणे खालीलप्रमाणे आहेत: संसदेचे बदलते स्वरूप: ३३ टक्के महिलांच्या उपस्थितीमुळे संसदेची चर्चा अधिक सर्वसमावेशक आणि संवेदनशील होईल. शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांसारख्या विषयांना अधिक महत्त्व मिळेल. नेतृत्वाची नवी फळी: स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहेच. आता २०३४ मध्ये राष्ट्रीय स्तरावर महिला नेतृत्वाची मोठी फळी निर्माण झालेली दिसेल. प्रादेशिक अस्मिता विरुद्ध राष्ट्रीय धोरण: दक्षिण विरुद्ध उत्तर असा संघर्ष टाळण्यासाठी सरकारला मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा नवा 'फॉर्म्युला' शोधावा लागेल. महिला आरक्षणाला २०३४ पर्यंत तिष्ठत ठेवणे हे एका मोठ्या लोकसंख्येवर अन्यायकारक ठरू शकते. मतदारसंघांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवणे हा एक सुवर्णमध्य असू शकला असता, परंतु प्रादेशिक राजकारणामुळे तो मागे पडला. आता सरकारला केवळ कागदावर आरक्षण देऊन चालणार नाही, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी जात गणना आणि सीमांकन या प्रक्रियांना गती द्यावी लागेल. २०३४ मध्ये जेव्हा भारतीय मतदार मतपेटीपाशी जाईल, तेव्हा त्याच्यासमोर केवळ पक्ष नसतील, तर आपल्या जातीचे प्रतिनिधित्व आणि आपल्या घरातील स्त्रियांचा सत्तेतील सहभाग हे दोन मुख्य मुद्दे असतील.

# सोडलेल्या नेत्याला लाखोली का वाहतात?

महाराष्ट्राचा राजकीय डीएनए ज्या सामाजिक व सांस्कृतिक अभिरुचीवर आधारला होता ती संपली आहे. जो पक्ष, नेता सोडला त्याला लाखोली वाहण्यात अनेकजण धन्यता मानत आहेत. आपण कसेही वागलो तरी लोक तरी काय करणार, असाच अविर्भाव दिसतो आहे.




डिसेंबर १९९१ मध्ये छगन भुजबळ यांनी ऐतिहासिक बंड करत शिवसेना सोडली आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टिकेची झोड उठविली तेव्हा अनेकांना ते आवडत नसे. पण काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय कसा अपरिहार्य होता हे पटविण्यासाठी त्यांना ते करावे लागत असणार. तेच नारायण राणे यांनी शिवसेना सोडली तेव्हा घडले. त्यांनी बाळासाहेबांवर कमी पण उद्धव ठाकरे व त्यांचे जवळचे काही लोक यांच्यावर तुफान टीका केली. राज ठाकरे वेगळे झाले तेव्हा कोणाचे थेट नाव घेतले नाही पण माझ्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे असे सूचक विधान केले.

शिवसेनेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडणारे थोड्याफार फरकाने हेच करत आले. पूर्वी काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस सोडून जाणारे इतकी टोकाची टीका करत नसत. अनेकांनी वेगवेगळ्या काँग्रेस काढल्या. पण लोकांना शिसारी येईल, अशी विधाने केली नाहीत. ज्या पक्षात आपण वाढलो आणि मान्यता मिळवली त्या पक्षावर वा तेथील नेत्यावर अर्वाच्च शब्दात टीका टाळली जाई. २००८ मध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर विलासराव देशमुख यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले आणि अशोक चव्हाण यांना संधी मिळाली. नारायण राणे यांचा मुखभंग झाला. तेव्हा त्यांनी चव्हाण, देशमुख, अहमद पटेल आदींवर सडकून टीका केली ती भाषेचा तोल जरासा सांभाळतच.

हे सारे उगाळण्याचे कारण असे की, अलीकडच्या काही वर्षांत विशेषतः २०२० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळीच संस्कृती उदयाला आली. मुद्द्यांचे राजकारण गुद्द्यावर आले. आपापल्या राजकीय भूमिका जनहिताच्या मुद्द्यांवर आधारीत आहेत हे सांगण्यापेक्षा ज्याला सोडून जातोय तो पक्ष वा नेता किती वाईट आहे हे सांगताना पातळी फारच घसरली. राजकारणाची एकूणच विश्वासार्हता कमालीची घसरतेय आणि जनमत फारच वाईट होतेय याची पर्वा कोणी करत नाही.

महाविकास आघाडीचे नेते म्हणून उद्धव ठाकरे यांनी राज्याची सूत्रे हाती घेतली तेव्हा त्यांना घेरण्यासाठी शेलक्या शब्दांचा वापर करत टोकाची भाषा वापरणाऱ्यांना पुढे चाल मिळत गेली. एकनाथ शिंदे यांनी ऐतिहासिक बंड करत भाजपासोबत सरकार स्थापन केले तेव्हा ठाकरे कसे घरी बसून काम करत होते, भेटत नव्हते आणि फेसबुकवरून भाषणे देत होते, असे सांगत टिकेची राळ उठविली. बाळासाहेबांचा वारसा न जपता त्यांनी हिंदुत्वाला कशी तिलांजली दिली यावर भर दिला.

अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केला तेव्हा आपला जुना पक्ष कसा दिशाहीन झाला आहे असे सांगत नेतृत्वाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अजित पवार यांनी राष्ट्रवादीचा एक गट फोडला तेव्हा आपले काका भाजपासोबत जाण्याचा निर्णय कसे घेत नाहीत आणि आम्हाला पुढे येऊ देत नाहीत, असे बोलत अनेक प्रश्न उपस्थित केले.

याच दरम्यान, भाजपात सामील झालेल्या नारायण राणे व त्यांच्या दोन्ही चिरंजीवांनी उद्धव ठाकरे यांना डिवचण्याची एकही संधी सोडलेली दिसली नाही. यादी खूप मोठी आहे. राधाकृष्ण विखे पाटील, संजय निरुपम पुढे मिलिंद देवरा यांनीही आपापल्या पूर्वीच्या पक्षसंघटनेवर असेच टीकेचे प्रहार केले. आता तर विख्यात पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या अत्यंविधीला विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. पण अपवाद एका पक्षाचा होता असे म्हणत काँग्रेसला डिवचले. त्यावर काँग्रेसकडून कडवट भाषेत प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न झाला.

या साऱ्या गोष्टीतून ठळक काय दिसते? तर रोज राजकीय विरोधकांवर दुगाण्या झाडणे हा एककलमी कार्यक्रम बनला आहे. पूर्वी राजकीय नेते विविध कळीच्या विषयांवर काय बोलतात याकडे लोकांचे लक्ष असे. शेती, सिंचन, सहकार, उद्योग, गुंतवणूक, प्रादेशिक विकास यावर त्यांची मते लोक ऐकत. आता मारा कशाचा आहे, तर शेलकी विशेषणे, हिणकस भाषा, हेटाळणी, दुस्वास आणि कमालीचा विखार. पूर्वी लोक नेत्यांकडून डंकेल प्रस्ताव, गॅट करार, आंतरराष्ट्रीय व्यापार खुला होण्याने भारतीय बाजारपेठेवर होणारे परिणाम, शेतीचे भवितव्य आदी विषयावर नेत्यांच्या भूमिका जाणून घेत. पण आता किती अभ्यासपूर्ण भाषणे, चर्चा होतात आणि लोकांना काय मिळते हे विचार करण्यापलीकडे गेले आहे.

हे एकाबाजूला ठेवले तर आपली राजकीय वाढ, विकास ज्या पक्षात झाला. ज्या पक्षाने मोठी पदे दिली, रंकाचा राव होण्याची संधी दिली, नवी ओळख तयार झाली, युती वा आघाडीत राहून राजकीय लाभ झाला, त्याबद्दल किती वाईट बोलावे आणि बोललो तर लोकांना काय वाटेल याचा विचार संपलेला दिसत आहे. प्रचंड वेगाने खालावत चाललेला राजकारणाचा दर्जा ही एक चिंताजनक समस्या बनली आहे.

आपणही पक्षाला खूप काही दिले असे म्हणणारेही आहेत. मग ते देण्याची क्षमता तरी कोणी निर्माण केली किंवा समोरच्या पक्षाने उताविळ होऊन स्वागत करावे एवढा आलेख कोणाच्या मदतीने उंचावला, पक्ष बदलला तरी महत्त्व मिळेल, असा बायोडेटा नेमका कशाच्या आधारावर तयार झाला असे विचारले तर काय उत्तर आहे? कोणी कोणाला पाहून ओशाळून जावे हा मोठा प्रश्नच आहे. शरद पवार यांनी १९७८ नंतर राजकारणात अनेक प्रयोग केले. वेगवेगळे पक्ष, आघाड्या तयार केल्या. पण त्यांना सोडून जाताना किंवा गेल्यानंतर त्यांच्या जुन्हा सहकाऱ्यांनी फार वाईट पद्धतीने त्यांच्यावर हल्ला चढविल्याची उदाहरणे दुर्मिळ आहेत. उलट सोडून गेलेले परत येताना ओशाळलेले दिसले नाहीत. एवढेच काय अजित पवारांनी भाजपासोबत जाण्याच्या घालमेलीबाबत केलेली काही विधाने सोडली तर नंतर त्यांच्यासकट त्यांच्या कोणत्याही नेत्याने थोरल्या पवारांना लक्ष्य करणे टाळलेले दिसते.

हेच उद्धव ठाकरे यांच्या बाबतीत का दिसून आलेले नाही, हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. ज्यांना त्यांनी मोठी पदे दिली, उमेदवाऱ्या दिल्या, विधानसभा, विधान परिषद, लोकसभेत जाण्याची संधी दिली ते सहजगत्या त्यांचे नेतृत्व झुगारून, टीका करत सोडून गेले. काहींनी तर फारच वाईट पद्धतीने टीका केली. आपण नेमके कसले लोक मोठे केले हा प्रश्न त्यांना नक्कीच पडला असणार. तसेच आपणसुद्धा कुठे कुठे चुकत गेलो आणि त्यामुळेच आपल्या पुढेमागे करणाऱ्यांना टिकेची संधी देत गेलो यावरही त्यांनी नक्कीच विचार केला असावा.

काँग्रेसने शिक्षण, सहकार या क्षेत्रात सम्राट तयार केले. कसलाही व्यक्तिगत करिश्मा नसणारे केवळ कुणाचे तरी राजकीय वारस म्हणून मोठे झाले, त्यांनीही अलीकडे पक्षनेतृत्वाला लक्ष्य करत टीका केली. आपण पक्षासाठी खूप केले असे त्यांचे म्हणणे असेल तर जनमानसात आधीच रुजलेल्या पक्षाचे चार जास्त सदस्य निवडून आणणे हे कर्तत्व ठरू शकत नाही. ते आणताना जी साधनसामग्री वापरली तीसुद्धा याच पक्षामुळे मिळाली होती हे कसे दुर्लक्षिता येईल? एकूणच महाराष्ट्राचा राजकीय डीएनए ज्या सामाजिक व सांस्कृतिक अभिरुचीवर आधारला होता ती संपली आहे. आता आपण कसेही वागलो तरी लोक तरी काय करणार आहेत आणि कुठे जाणार आहेत, असाच अविर्भाव दिसतो आहे.

# विदर्भात राष्ट्रपतींचा प्रेरणादायी दौरा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नागपूर-वर्धा दौऱ्याने विदर्भात विशेष लक्ष वेधले, विविध दीक्षांत समारंभांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशासन, वैद्यक आणि शिक्षण क्षेत्रात नैतिकता व समावेशकतेचा संदेश देत त्यांनी विकसित भारताच्या दिशेने प्रेरणा दिली.




भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची या आठवड्यातील नागपूर आणि वर्धा भेट हीच महत्त्वाची बातमी राहिलेली आहे. आपल्या दोन दिवसांच्या या दौऱ्यात त्यांनी नागपूरच्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सच्या दुसऱ्या दीक्षांत समारोहात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली, तर नॅशनल ॲकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या ७८ व्या तुकडीच्या समारोप सोहळ्याला देखील त्या उपस्थित राहिल्या. त्याचबरोबर वर्धा येथे जाऊन त्यांनी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारोहात प्रमुख अतिथी म्हणूनही मार्गदर्शन केले.

नॅशनल ॲकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ही भारत सरकारची महसूल खात्यातील सनदी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९४४ मध्ये झाली. त्यावेळी ही अकादमी आय. आर. एस. स्टाफ ट्रेनिंग कॉलेज या नावाने कोलकाता येथे सुरू झाली होती. नंतर १९५६ मध्ये देशात राज्य पुनर्रचना झाली. त्यावेळी नागपूर शहराचे राजधानीपद गेले होते. म्हणून केंद्र सरकारने नागपुरात काही महत्त्वाच्या केंद्रीय संस्था आपल्या मुख्यालयासह स्थापित केल्या. त्यात आजची निरी, ॲगमार्क लॅबोरेटरी आणि आय. आर. एस. स्टाफ कॉलेजचा समावेश होता. १९८० पर्यंत ही संस्था आय. आर. एस. स्टाफ ट्रेनिंग कॉलेज म्हणूनच ओळखली जात होती. मात्र १९८० मध्ये या संस्थेचे रूपांतर नॅशनल अकादमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेसमध्ये करण्यात आले. आज नागपुरात छिंदवाडा रोडवर विशाल अशा परिसरात या अकादमीचे कामकाज चालते आहे.

या अकादमीत झालेल्या ७८ व्या बॅचच्या समारोप सोहळ्यात राष्ट्रपतींनी सर्व नव्याने तयार होणाऱ्या सनदी महसूल अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. या बॅचमध्ये १३० अधिकारी असून १६ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ते आता प्रशासनात सक्रिय होणार आहेत. यावेळी या नव्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना विकसित भारत या संकल्पनेकडे देश वाटचाल करत असताना प्रशासनातील पारदर्शकता कार्यक्षमता आणि समावेशकता अधिक बळकट करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपतींनी केले. यावेळी त्यांनी कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा उल्लेख करताना नागरिकांवर कराचा अतिरिक्त भार न टाकता न्याय्य आणि संतुलित पद्धतीने काम करा, असा सल्लाही दिला.

२०१४ मध्ये नागपूरचे खासदार नितीन गडकरी केंद्रात मंत्री झाले. त्याच वर्षी नागपूरकर देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. या दोघांच्या कालखंडात नागपुरात ज्या काही नव्या संस्था आल्या त्यात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या संशोधन संस्थेचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. आज वर्धा मार्गावर मिहानमध्ये या संस्थेचे विस्तीर्ण कॅम्पस कार्यरत आहे आणि तिथे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाचीही सुविधा उपलब्ध आहे. या संशोधन संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या संस्थेचा दुसरा दीक्षांत सोहळा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णू देव शर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव असे सर्वच मान्यवर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते संस्थेतील सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यात डॉ.प्रियंका, डॉ.वैदेही लोया, डॉ.वेदवती बंडोपाध्याय, डॉ.श्रीहरी बाबू, डॉ.तोसिफ अहमद प्रभृती गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश होता. तंत्रज्ञान कितीही प्रगत झालेले असले तरीही वैद्यक व्यवसायातील डॉक्टरांची बुद्धिमत्ता नैतिकता प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन हाच रुग्णसेवेत महत्त्वाचा भाग ठरणार आहे. त्यामुळे याच विचारांनी विद्यार्थ्यांनी पुढे जावे, असे आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केले. हा केवळ व्यवसाय म्हणून न बघता संवेदनशीलतेने मानव सेवा करण्याचा मार्ग आहे असेही राष्ट्रपतींनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितले. नागपूर नजीकचा वर्धा जिल्हा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भूदान चळवळीतील अग्रणी विनोबा भावे यांची कर्मभूमी म्हणून ओळखला जातो. आजही पवनार येथे विनोबा भावे यांचा तर सेवाग्राम येथे महात्मा गांधींचा आश्रम कार्यरत आहे. महात्मा गांधी हे हिंदीचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळेच वर्धा येथे सुमारे २५ वर्षांपूर्वी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. आज देशभरातून विद्यार्थी येथे येऊन हिंदीचे अध्ययन आणि संशोधन करीत असतात. या विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारोहात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# खोटी विधाने करून कोर्टाची दिशाभूल करणे महागात पडले : हायकोर्टाने याचिकाकर्त्याला ठोठावला १ लाखाचा दंड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – खोटी विधाने करून आणि तथ्ये लपवून न्यायालयाची दिशाभूल करणे एका याचिकाकर्त्याला चांगलेच महागात पडले. न्यायालयाची दिशाभूल करुन अमूल्य वेळ वाया घालवल्याबद्दल याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारले आणि १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. स्वच्छ हाताने न्यायालयाची पायरी न चढणाऱ्यांना दिलासा दिला जाऊच शकत नाही, असे न्या. फरहान दुभाष यांनी सुनावले आणि रोमेश शर्मा नावाच्या व्यक्तीची याचिका फेटाळून लावली. रोमेश शर्मा यांनी पाली हिल येथील एका मिळकतीबाबत १९८७ मध्ये दावा दाखल केला होता. या दाव्यातील मूळ प्रतिवादी (नाथ सिंग चावला) यांचा १९९० मध्ये मृत्यू झाला होता. मात्र त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणण्यासाठी शर्मा यांनी २०१५ मध्ये अर्ज केला. या अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे.

# सरकारी कर्मचारी, शिक्षक मंगळवारपासून संपावर

## सरकारी कार्यालये, शाळा, रुग्णालये ठप्प होणार; विविध मागण्यांसाठी संप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त जागांची भरती, शिक्षकांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करणे या आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील १७ लाख सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. राज्य सरकारने मागण्या मान्य न केल्यास मंगळवार, २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने शुक्रवारी दिला.

मागील कालखंडात अनेक प्रलंबित मागण्यांबाबत जी आश्वासने दिली होती त्याचा विसर सरकारला पडलेला आहे. आर्थिक आणि सेवाविषयक जिव्हाळ्याच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने चालविलेली चालढकल ही कर्मचारी-शिक्षकांच्या जिव्हारी लागली आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित रास्त मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचारी, शिक्षकांनी गेल्या वर्षभरात सात वेळा संघटनात्मक लक्षवेधी आंदोलने छेडली. परंतु सरकारने आंदोलनांची कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षकांचा संताप अनावर झाल्याचे समन्वय समितीने यासंदर्भात जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

राज्य सरकारच्या वतीने सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतनासंदर्भात नियम आणि कार्यपद्धती तसेच अटी व शर्ती विषद करणारी अधिसूचना दोन वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप काढण्यात आलेली नाही. त्यामुळे १ मार्च २०२४ पासून आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनदेखील अद्याप प्राप्त झालेले नाही.

# ...अन्यथा घरे जाणार : पत्राचाळवासीयांना निर्वाणीचा इशारा

## पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरूंना न्यायालयाचा अल्टिमेटम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर म्हणजेच पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील उर्वरित ३३ भाडेकरूंना ३० एप्रिलपर्यंत आपल्या पुनर्वसन सदनिकांचा ताबा घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले आहेत. मुदतीत ताबा न घेतल्यास 'म्हाडा' ही घरे इतर सार्वजनिक गृहनिर्माण कामांसाठी वापरण्यास मोकळी असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मुंबईत घरांची मोठी टंचाई असून, काही रहिवाशांच्या टाळाटाळ करण्यामुळे घरांचा साठा पडून राहू शकत नाही, असे निरीक्षण न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठाने नोंदवले.

ज्या भाडेकरूंनी ताबा घेतला नाही, त्यांना घराची तातडीची गरज नाही असे गृहीत धरले जाऊ शकते, असे न्यायालयाने म्हटले आहे. ही घरे प्रकल्पग्रस्त किंवा सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वापरण्याची परवानगी 'म्हाडा'ला देण्यात आली तरी संबंधित भाडेकरू योग्य नोटीस देऊन नंतर ताबा मागू शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रक्रियेसाठी 'म्हाडा'च्या अधिकाऱ्यांनी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत प्रकल्पस्थळी उपस्थित राहून ताबा देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश खंडपीठाने दिले आहेत. या सदनिकांच्या विक्रीवर पाच वर्षांची बंदी नसल्याची माहिती 'म्हाडा'च्या वकील मनिषा जगताप यांनी न्यायालयात दिली. ही बंदी केवळ लॉटरी पद्धतीने मिळालेल्या घरांसाठी लागू असते. यावर न्यायालयाने धोरणात सुसूत्रता असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

बेकायदेशीर हस्तांतरण झाल्यास सरकारचा महसूल बुडतो, त्यामुळे मुद्रांक शुल्कातून सरकारचा फायदा व्हायला हवा, असेही खंडपीठाने नमूद केले. गेल्या अनेक वर्षांपासून पत्राचाळीचा प्रकल्प रखडलेला आहे.

## सीबीएसई एआयएसएसई परीक्षेत

# स्कूल ऑफ स्कॉलर्सचा निकाल १०० टक्के

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई इयत्ता १० वी अखिल भारतीय माध्यमिक शाळा परीक्षा २०२५-२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले असून शाळेचा उल्लेखनीय १०० टक्के निकाल लागला आहे.

शाळा व्यवस्थापनाने आपल्या भविष्यातील सकारात्मक विद्वानांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. गुणवत्ता यादीत इशिका दिनकर बर्डे हिने ९६.२ टक्के गुणांसह आघाडी घेतली असुन खुशी मनोहर सुरजुसे हिने ९५.६ टक्के, नैतिक पद्माकर ठाकरे याने ९२.८ टक्के व प्रेरणा गणपत निकम हिने ९०.२ टक्के गुण मिळवत सत्र २०२५-२६ चे टॉपर ठरले. या व्यतिरिक्त इतर अनेक विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश मिळवुन शाळेचे नाव उज्वल केले असून यातुन विद्यार्थी व शिक्षकांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेचे व सातत्यपुर्ण परिश्रमाचे प्रतिबिंब दिसुन येते.

व्यवस्थापन, प्राचार्य व शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले तसेच पालकांच्या निरंतर सहकार्याबद्दल आभार मानले.

भविष्य, सकारात्मक या ब्रीदवाक्यानुसार गुणवत्तापुर्ण शिक्षण व सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे शाळेने स्पष्ट केले.

# बीएमसी मधील १२२ अभियंत्यांच्या बदल्या रद्द : भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर प्रशासनाचा यू-टर्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** –मुंबई महापालिकेने १२२ अभियंत्यांच्या बदल्या अखेर रद्द केल्या आहेत. बदल्यांमध्ये कथित गैरव्यवहार आणि 'ट्रान्सफर मार्केट'च्या आरोपांमुळे हा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे ऑक्टोबर २०२५ मध्ये या बदल्या करण्यात आल्या होत्या, मात्र त्यानंतर तक्रारी, आक्षेप आणि चौकशीच्या मागण्यांमुळे संपूर्ण प्रक्रिया वादात सापडली होती. महापौर रितू तावडे यांनी या प्रकरणाची दखल घेत कारवाईची मागणी केल्यानंतर प्रशासन हललं. अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांच्याकडे हे प्रकरण पाठवण्यात आलं आणि अखेर १२२ अभियंत्यांच्या बदली आदेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यकर्ते अनिल गलगली आणि भाजपचे शहराध्यक्ष अमित साटम यांनी या बदल्यांमध्ये भ्रष्टाचाराचे आरोप करत तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर तत्कालीन आयुक्त भूषण गगराणी यांनी या बदल्यांना स्थगिती दिली होती. आता त्या बदल्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे महापालिकेतील बदली प्रक्रियेतील पारदर्शकतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे हा निर्णय भ्रष्टाचारा विरोधातील कारवाई म्हणून पाहिला जात असला, तरी दुसरीकडे इतक्या मोठ्या प्रमाणात झालेल्या बदल्या रद्द कराव्या लागणं, ही प्रशासनातील अनियमिततेची कबुली मानली जात आहे.

# जनता इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका आंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाषणे केली तसेच त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवुन दिले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जाणीव निर्माण झाली. कार्यक्रम यशस्विपणे पार पडला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# कॅफे चालकासोबत प्रतितास ४०० रुपयांची डील

## सेप्रेट कम्पार्टमेंटमध्ये तरुणींसोबत नको 'ते' कृत्य, मास्टरमाईंडचा धक्कादायक कारनामा उघड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**परतवाडा** – अमरावतीच्या परतवाडामध्ये तरुणींचे लैंगिक शोषण आणि अश्लील व्हिडिओ व्हायरल केल्याच्या प्रकरणाच्या तपासात दिवसागणिक धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य मास्टरमाईंड अयान अहमद तनवीर अहमद (१९, रा.परतवाडा) याच्या अटकेनंतर या प्रकरणाला वेगळे वळण लागले असून त्याचा कारनाम्याची संतापजनक माहिती समोर येऊ लागली आहे. अशातच आता आरोपी अयान अहमद अमरावती शहरातील ज्या कठोरा नाका भागातील फ्लॅटवर मुलींचे लैंगिक शोषण करत होता, त्याच कठोरा भागात असलेल्या 'द कॅफे रॉयल १०' कॅफेमध्ये देखील मुलींना आणायचा, अशी माहिती तपासात पुढे आली आहे. दरम्यान, या कॅफेमध्ये मुलींना घेऊन बसण्यासाठी आरोपी अयान कॅफे चालकाला चारशे रुपये प्रतितास द्यायचा. सोबतच या कॅफेमध्ये प्रत्येक कपल्सला बसण्यासाठी वेगवेगळे सुरक्षित कंपार्टमेंट असल्याचीही सूत्रांची माहिती आहे.

आयानला पोलिसांनी कॅफेत आणलं; कॅफेवर अमरावती पोलिसांनी तीन ते चार वेळा रेड विशेष म्हणजे या 'द कॅफे रॉयल १०' कॅफेवर अमरावती पोलिसांनी तीन ते चार वेळा रेड केलेली आहे. अशातच आरोपी अयान हा अमरावतीसह अचलपूर, परतवाडा मधील कॅफेमध्ये देखील मुलींना घेऊन जायचा. त्या कंपार्टमेंटमध्ये मुला-मुलींचे अश्लील चाळे चालत असल्याचेही समजते. दरम्यान, आरोपी आयानला पोलिसांनी या ठिकाणी चौकशीसाठी आणलं होतं. काल (शुक्रवारी) पोलिसांनी या कॅफे चालकाची चौकशी केली असून कॅफेचा पंचनामा देखील केला आहे.

त्यामुळे या कॅफेवर आता पुन्हा मोठी कारवाई केली जाते का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. पालकमंत्री म्हणून मी रोज या घटनेला बघत आहे अमरावतीला प्रत्यक्ष जाऊन घटनेचा आरोपीबाबत काय तपास झाला, हे पालकमंत्री म्हणून मी रोज या घटनेला बघत आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता ॲडव्हान्स प्रणाली वापरून, फॉरेन्सिक आणि डिजिटल प्रणालीचा वापर करून तपास सुरु आहे. चौकशी भरकटेल असे कुठलेही वक्तव्य कोणी करू नये. डिजिटल पुरावे त्याच्याजवळ ऑडिट केला जाणार आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जंयती निमित्त

# शहरात ढोल ताशाच्या गजरात शोभायात्रा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जंयती शहरात शोभायात्रा काढुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नामाचा गजर करत व ढोल ताशाच्या गजरात साजरी करण्यात आली.

ठिक ठिकाणी विविध सामाजिक संघटनांसह नागरिकांनी शोभायात्रेचे स्वागत करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. मलकापूर येथील डॉ.भदंत आनंद कौशल्यान बौध्द विहार येथुन समता सैनिकांसह ग्रामस्थांनी रॅली काढली. शांतीवन येथील दीक्षाभूमीवर डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन पंचशील ध्वजारोहण करुन मानवंदना देण्यात आली. सायंकाळी ६ वाजता मलकापूर बौध्द विहारातुन ढोल ताशांच्या गजरात व महामानवांच्या जय जयकारात शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली.

शोभयात्रेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुर्ण कृती पुतळे, मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होते. यावेळी ढोल ताशाच्या गजरात तरुणाई थिरकतांना दिसली.

महिला मंडळी सुद्धा मोठ्या प्रमाणात दोन, दोनच्या लाईन शिस्तबद्ध पद्धतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जय जयकार करत रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या. त्याचप्रमाणे रॅलीचे ठिकाणी विविध संघटना व सामाजिक संस्था, आमदार चंदु यावलकर, नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे, नगरसेवक तसेच विविध मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करत अभिवादन केले व ठिक ठिकाणी पाणी, खाऊ, शरबतचे वाटप सुद्धा करण्यात आले.

ही शोभयात्रा मलकापूर येथील दीक्षाभूमी मार्गे, आठवडी बाजार चौक, गफ्फार चौक, विंचुरकर चौक, मलम शावली, ऑटो स्टेंड चौक, राजकमल चौक, गळ्याचे गोठाण मार्गे बौध्द विहारात समारोप करण्यात आला. या शोभयात्रेकरीता ठाणेदार दिपक माहडीक यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# संसदेत तुम्ही स्वत:ला महिलांचे कैवारी म्हणवून घेता, पण उन्नाव, हाथरस, मणिपूरमध्ये सगळ्यांनी पाहिलंय...

## प्रियांका गांधींचा भाजपला सणसणीत टोला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नरखेड** – भाजपला महिलांचे मसीहा बनायचे आहे, पण महिलांनी उन्नाव, हाथरस आणि मणिपूरमध्ये काय घडले ते पाहिले आहे.

दिल्लीच्या रस्त्यावर बसलेल्या महिला खेळाडूंना कोणी विचारले? केवळ संसदेत उभे राहून मसीहा म्हणवून घेतल्याने फरक पडत नाही, तर तसे करून दाखवावे लागते, अशा शब्दात काँग्रेस सरचिटणी प्रियांका गांधी पीएम मोदींसह भाजपवर हल्ला चढवला. आम्हाला आश्चर्य वाटले की अचानक हे अधिवेशन का बोलावले गेले? कोणालाही मसुदा माहित नव्हता. हे एक प्रकारचे षडयंत्र होते की महिलांच्या नावावर आरक्षण आणून स्वतःची सत्ता कायमस्वरूपी कशी टिकवता येईल. हे विधेयक महिलांसाठी नव्हते, तर ते पुनर्रचनेसाठी होते, असा टीका त्यांनी केली.

महिलांच्या माध्यमातून सत्तेत राहण्याचा कट प्रियांका गांधी म्हणाल्या, भाजप म्हणतेय की हा 'काळा दिवस' आहे. त्यांच्यासाठी तो काळा दिवस असेलच, कारण पहिल्यांदाच त्यांना असा मोठा धक्का बसला आहे जो बसणे गरजेचे होते. आता पीआर आणि मीडियाबाजी चालणार नाही, जनतेचा विश्वास उडाला आहे. इंदिरा गांधी आणि अटल बिहारी वाजपेयी यांनी जागांच्या संख्येवर 'फ्रीज' लावला होता कारण त्यांना उत्तर आणि दक्षिण भारतामध्ये फूट पाडायची नव्हती. जर सरकारने पुनर्रचनेद्वारे दक्षिण भारतातील आणि छोट्या राज्यांचे वजन कमी केले, तर देशात मोठे संकट निर्माण होईल. आम्ही याच्याशी सहमत होऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

घटनादुरुस्ती विधेयक हा एक कट होता त्यांनी सांगितले की, हा संपूर्ण कट रचला गेला कारण सत्तेत राहायचे होते. ते आता होणार नाही; मतदारसंघ पुनर्रचना २०२९ पर्यंत होणार नाही. हे महिलांच्या नावावर केले जात होते, जेणेकरून त्यांना सत्तेत राहण्याचे स्वातंत्र्य मिळेल.

केंद्र सरकारला वाटले की जर हे विधेयक मंजूर झाले, तर ते जिंकतील. जर तसे झाले नसते, तर ते प्रत्येक विरोधी पक्षनेत्याला महिला-विरोधी सिद्ध करून महिलांचे तारणहार बनले असते. हा महिलांचा प्रश्न नव्हता, तर मतदारसंघ पुनर्रचनेचा होता. विरोधी पक्षाने निषेध केला याचा मला आनंद आहे. हा त्यांच्यासाठी काळा दिवस आहे, कारण हे कसे घडले याने त्यांना धक्का बसला आहे.

# संजय राऊत मानहानी प्रकरणी मंत्री राणेंविरुद्ध जामीनपात्र वॉरंट जारी, माझगाव न्यायालयाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या फौजदारी तक्रारीप्रकरणी माझगाव न्यायदंडाधिकाऱ्यांनी भाजप नेते आणि मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास राज्यमंत्री नितेश राणे यांच्याविरुद्ध जामीन पात्र वारंट काढले आहे. नितेश राणे यांच्याकडून ७ मे रोजी एक वक्तव्य करण्यात आले होते. येत्या १० जूनपर्यंत संजय राऊत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील, असे नितेश राणे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यावर संजय राऊत यांनी अब्रुनुकसानीचा दावा केला होता. दरम्यान, या प्रकरणी माझगावच्या कोर्टात ही केस सुरू असताना नितेश राणेंनी दुसऱ्या कोर्टात या केसची सुनावणी व्हावी, अशी मागणी करत सेशन कोर्टात धाव घेतली होती. मात्र, सेशन कोर्टाने नितेश राणेंची ही मागणी फेटाळली, त्यानंतरच्या दोन्ही तारखांना नितेश राणे हजर न राहिल्याने माझगाव कोर्टाने आत नितेश राणेंविरोधात जामीन वॉरंट काढले आहे. त्यामुळे आता नीतेश राणे यांना कोर्टात उपस्थित राहून जामीन घ्यावा लागणार आहे. सत्तांतराच्या नाट्यकाळात ठाकरे गटाचे नेते संजय राऊत हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे वक्तव्य नितेश राणे यांनी केलं होतं.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२८८/२०२६** **ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती वत्सला पुरुषोत्तमराव घारड, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम, २) योगेश पुरुषोत्तमराव घारड, वय अं.४५ वर्ष, धंदा- शेती, ३) मनोज पुरुषोत्तमराव घारड, वय अं.४२ वर्ष, धंदा- शेती, अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे पुरुषोत्तम वामनराव घारड, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# धामणगाव रेल्वे येथे सोमवारी जप्त केलेल्या २५० ब्रास रेतीचा लिलाव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – धामणगाव रेल्वे तालुक्यातील सलाबतपूर येथे अवैध साठवणूक केलेली अंदाजे २५० ब्रास रेती जप्त करण्यात आली आहे. या रेती साठ्याचा जाहीर लिलाव सोमवार, दि. २० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. सलाबतपूर येथील गट सर्व्हे क्रमांक ८३/२ मध्ये अवैध स्वरूपात अंदाजे २५० ब्रास रेतीचा साठा आढळून आला होता. उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांनी या साठ्यावर जप्तीची कारवाई करून त्याच्या लिलावासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार, जिल्हाधिकारी यांनी लिलावास मान्यता दिली आहे. त्यानुसार सोमवार, दि. २० एप्रिल रोजी दुपारी २ वाजता धामणगाव रेल्वे तहसील कार्यालयात जाहिर लिलाव होणार आहे. लिलावात सहभागी होणाऱ्या इच्छुक बोलीधारकांनी २५ टक्के रक्कम म्हणजेच ४५ हजार ६९० रूपये अनामत म्हणून जमा करणे आवश्यक आहे.

ही रक्कम धनादेश, डिमांड ड्राफ्ट किंवा रोख स्वरूपात बोली सुरू होण्यापूर्वी जमा करावी लागणार आहे. नेमून दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा लिलाव प्रक्रियेत विचार केला जाणार नाही. असे धामणगाव रेल्वेचे तहसिलदार अभय घोरपडे यांनी कळिवले आहे.

# 'मुव्ही ट्रॅप' रोखणार डासांची उत्पत्ती : मलेरिया, डेंग्यू आजारांचा प्रादुर्भाव नियंत्रित होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – 'मुव्ही ट्रॅप' या वापरण्यास अत्यंत सुलभ असणाऱ्या आणि पर्यावरणपूरक असणाऱ्या सापळ्याकडे त्यातील 'ॲट्रॅक्टन्ट्स'मुळे डासाची मादी आकृष्ट होते आणि त्यातील पाण्यात अंडी घालते. ही अंडी पाण्यातील वैशिष्ट्यपूर्ण कीटकनाशकांमुळे तात्काळ नष्ट होतात. अशाप्रकारे डासांच्या उत्पत्तींवरच अर्थात मुळावरच घाव घातला जात असल्याने डासांच्या उत्पत्तीला प्रतिबंध होतो. मलेरियासह डेंग्यू, झिका, चिकनगुनिया यासारख्या डासांमुळे पसरणाऱ्या आजारांनादेखील प्रतिबंध होतो.

महापालिकेच्या अखत्यारितील 'सोसायटी फॉर मुंबई इनक्यूबेशन लॅब टू एंटरप्रेन्योरशिप (स्माईल) कॉन्सिल'च्या माध्यमातून पालिका क्षेत्रातील विविध स्टार्टअप उद्योगांना बळ देण्याचे करण्यात येत असलेले कार्य अभिनंदनीय आहे, असे उद्गार पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी काढले. 'मुव्हीट्रॅप' या डास निर्मूलनावेळच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पद्मश्री शास्त्रज्ञ प्रा. ए. पी. दाश, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर, प्राध्यापक सुशांता कुमार घोष, दिल्लीस्थित 'आयसी डीएचआय' या संस्थेचे सल्लागार डॉ.रजनी कांत, पालिकेच्या व्यवसाय विकास कक्षाच्या डॉ.शशी बाला, नायर रुग्णालयातील 'प्रिव्हेंटिव्ह व सोशल मेडिसिन' विभागाच्या विभाग प्रमुख डॉक्टर रुजुता हाडये, पालिका कीटकनाशक अधिकारी रितेश मरापे, 'मुव्ही ट्रॅप' या स्टार्टअप संस्थेचे प्रसाद फडके उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**जे.एस.ठाकरे मॅडम, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२८५/२०२६** **ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-**

१) सुनिता मानकर धुर्वे, वय अं.४८ वर्ष, धंदा-मजुरी

२) मानकर तातु धुर्वे, वय अं.५७ वर्ष, धंदा- मजुरी

दोन्ही रा.वार्ड क्र.२, भवानी डोह, सातनुर, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत विजय मानकर धुर्वे, रा.भवानी डोह सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२७२/२०२६** **ने.ता.०८/०५/२०२६**

**अर्जदार :-**

राजु रामकृष्ण माळोदे

वय अं.५२ वर्ष, धंदा-मजुरी

रा.संभापेठ, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत रामकृष्ण पांडुरंगजी माळोदे व मयत सुमनबाई रामकृष्ण माळोदे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१२१८/२०२५** **ने.ता.१०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कमल केशव वानखडे, वय अं.८३ वर्ष, धंदा-आराम, २) मनोहर केशव वानखडे, वय अं.५७ वर्ष, धंदा- शेती, दोन्ही रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती, ३) ज्ञानेश्वर केशव वानखडे, वय अं.५९ वर्ष, धंदा- शेती, रा.हिंगणा, नागपूर, ४) सौ.गुंफा अशोक काळमेघ, वय अं.६४ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत केशव अमृतराव वानखडे, रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०३/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१६९/२०२६** **ने.ता.०२/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुवर्णा संजय गणेशकर, वय अं.५० वर्ष, धंदा-गृहीणी, २) आकाश संजय गणेशकर, वय अं.३० वर्ष, धंदा- व्यापार, ३) आशिष संजय गणेशकर, वय अं.२७ वर्ष, धंदा- मजुरी, सर्व रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत लिलाबाई अंबादास गणेशकर, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०३/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# राज्याच्या शिक्षण विभागाचा अजब अन असंवेदनशील प्रकार, ऐन उन्हाळ्यात चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा

## विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्याच्या शिक्षण विभागाचा अजब, असंवेदनशील आणि भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाच्या 'महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे'कडून ऐन उन्हाळ्यात चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येत आहे. राज्यात उन्हाचा पारा ऐन ४४ अंशापर्यंत वाढलेला असतांना २४ एप्रिलला चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आला आहे. येत्या रविवार दिनांक २४ एप्रिलला हि परिक्षा होतेय. सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याची परीक्षा परिषदेने सूचना जारी केली आहे. मात्र एकीकडे उन्हानं नवा उच्चांक गाठला असताना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या या अजब निर्णयाने विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.




ऐन उन्हाळ्यात पालकांची आणि विद्यार्थ्यांची चांगलीच दमछाक दरम्यान, या परीक्षा २४ एप्रिलला सकाळी ११ ते १२:३० पर्यंत भाषा आणि गणित विषयाचा पहिला पेपर असेल. तर दुपारी भर उन्हात २ ते ३.३० या वेळेत इंग्रजी आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांचा पेपर असणार आहे. दोन्ही पेपर प्रत्येकी ७५ गुणांचे असून अनेक ठिकाणी परीक्षा केंद्र हे शहरापासून ५ ते १० किलोमीटर अंतरावर आहे. ऐन उन्हाळ्यात चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्याला पाल्यांना परीक्षा केंद्रावर घेऊन जाताना पालकांना उन्हापासून संरक्षणाची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. परिणामी पालकांची आणि विद्यार्थ्यांची यात चांगलीच दमछाक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात उन्हामुळे ठरवलेल्या वेळेआधीच शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

शिक्षण विभागाच्या गोंधळाचा विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप अशातच, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णय घेऊन ५ आणि ८वी साठी असलेली परीक्षा ४ आणि ७वी साठी घेण्याचे ठरविण्यात आले. पूर्वीच्या शासन निर्णयानुसार ५ वी आणि ८ वी ची यंदाची परीक्षा २२ फेब्रुवारी २०२६ ला आटोपली. नव्या शासन निर्णयानुसार यंदा ही परीक्षा दोनदा घेतली जात आहे.

सीबीएसई वर्ग दहावीच्या निकालात

# न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांची यशाची परंपरा कायम



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - सी.बी.एस.ई. वर्ग दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून आपल्या शहरातील नामांकित व अग्रेसर सी.बी.एस.ई.स्कूल न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटने त्यांची यशाची परंपरा कायम ठेवत यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केलेत. शाळेतील एकुण १४८ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट होते.

शाळेतील प्रतिभावान विद्यार्थी हार्दिक अजय बर्डे ह्याने ९६.८ टक्के गुण प्राप्त करुन शाळेतुन प्रथम येण्याचा मान मिळिवला. साची जयंत काशीकर हिने ९६.२ टक्के गुण मिळवुन द्वितीय क्रमांक, प्रशंसा राजीव सातनुरकर हिने ९५.२ टक्के गुण मिळवुन तृतीय क्रमांक, सोहम ईश्वरचंद्र श्रीराव ह्याने ९५ टक्के गुण मिळवुन चतुर्थ, पृथा राहुल खेरडे व साची प्रियांक खंडेलवाल या दोन्हीही विद्यार्थिनींनी ९४.२ टक्के गुण मिळवुन पाचवा क्रमांक तर आराध्य प्रफुल होले ह्याने ९४ टक्के गुण मिळवुन सहावा क्रमांक मिळिवण्याचा मान प्राप्त केला.

या शिवाय परीक्षेला बसलेल्या एकुण विद्यार्थ्यांपैकी तनिष्का विजय खोडसकर ९३.६ टक्के, नंदिनी विजय गोडबोले ९२.८ टक्के, जानवी धिरजसिंह ठाकुर ९२.८ टक्के, नैतिक रणजित मालवीया ९२.८ टक्के, आयुष उदय खाडे ९२ टक्के, लक्ष पुर्णेश्वर पुंड ९२ टक्के, आयुष नरेंद्र पटेल ९१.६ टक्के, पृथ्वीराज स्वप्निल नागमोते ९१.२ टक्के, राम नरेंद्र घारड ९१ टक्के, पियुष विजय गावंडे ९१ टक्के, वैष्णवी मोहन झोड ९१ टक्के, स्वरा संजय महादगडे ९०.८ टक्के, साहिल राजेंद्र राऊत ९०.८ टक्के, सेजल ओमप्रकाश मेंघानी ९०.६ टक्के, सोहम भुपेंद्र पोहरकर ९०.४ टक्के, स्मित रविंद्र भोंडे ९०.४ टक्के, माधव अजय अटलोये ९०.४ टक्के, आयुष राधेश्याम धुर्वे ९०.४ टक्के, सार्थक विजय साबळे ९०.२ टक्के या सर्व विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेत.

इंग्रजी या विषयात प्रशंसा राजीव सातनुरकर हिने १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेत. मराठी या विषयात हार्दिक अजय बर्डे, प्रशंसा राजीव सातपुरकर, राम नरेंद्र घारड, हिमांशु प्रभाकर बोडखे, तीर्थेश दिनेश सदापुरे या सर्व विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळिवले तर हिंदी या विषयात जान्हवी धीरजसिंग ठाकुर हिने १०० पैकी ९९ गुण मिळविले.

गणित या विषयात साची जयंत काशीकर, आराध्य प्रफुल होले, आयुष राधेश्याम धुर्वे या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९५ गुण मिळिवले. विज्ञान या विषयात साची जयंत काशीकर हिने १०० पैकी ९९ गुण मिळिवले. सामाजिक शास्त्र या विषयात महिमा रवींद्र वानखडे हिने १०० पैकी १०० गुण मिळिवले तर आय.टी.या विषयात हार्दिक अजय बरडे ह्याने १०० पैकी ९९ गुण, तनिष्का विजय खोडस्कर हिने १०० पैकी ९९ गुण प्राप्त केलेत.

या सर्वच प्रतिभावान विद्यार्थ्यांना शाळेच्या प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, शितल टाकरखेडे, सविता आंडे, मीनाक्षी वाहाने, संगीता काळे, विनोद भाकरे, गौतम वाघ, अंचल काळे, नितीन वसु, अर्जुन कोवळे, भावना देशमुख व शाळेतील सर्वच शिक्षकांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले.

यश संपादित करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे शालेय संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजेंद्र राजोरिया, सदस्य विनय यावलकर, प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, पी.आर.ओ.किशोर देशमुख, प्री प्रायमरी विभागाचे प्रमुख पराग भोंडे, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सर्व कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनापासुन कौतुक केलेत व पुढील वाटचालीकरीता त्यांना शुभेच्छा दिल्यात.

# महिलेने लग्नास दिला नकार, संतापलेल्या होणाऱ्या नवऱ्याने थेट प्रियकराचा काढला काटा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मुंबईच्या वांद्रे येथील खेरवाडी परिसरात झालेल्या अभिनव कुमार प्रकरणाचा मुंबई पोलिसांनी अवघ्या ६० तासांत यशस्वी छडा लावला आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी मुख्य आरोपी




निरज कुमार विलास चौधरी (३१) याला कोलकाता विमानतळावरून ताब्यात घेतले. महिलेने लग्नास नकार दिल्याने निर्माण झालेल्या रागातून हा प्रकार घडल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

१३ एप्रिल रोजी खेरवाडीतील कल्पतरू स्पार्कल परिसरात अभिनव कुमार या तरुणाच्या गळ्यावर वार करून त्याला संपवण्यात आले होते. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली.

प्रकरणामागे 'लव्ह अँगल' पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत अभिनव कुमार एका महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये होता.







